सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र. ५ या कार्यालयास चेंबूर येथील प्रशासकीय इमारत क्र. २ मधील जागा वाटप करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. शाकाजा-१११९/प्र.क्र.७/२०१९/२२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: २८ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र.५ हे कार्यालय सद्य: मौजे चेंबूर येथील राशनिंग ऑफीस कंपाउंड मधील नवीन प्रशासकीय इमारत क्र. २ मध्ये ३५० चौ.फूट जागेत कार्यरत आहे. सदरच्या जागेमध्ये सह दुय्यम निबंधकांसह अन्य ५ अधिकारी व कर्मचारी यांच्याकरीता बैठक व्यवस्था आहे. सदर कार्यालयाकरीता आवश्यक असणारी अन्य सामग्री व इतर अभिलेख कायमस्वरुपी जतन करण्यासाठी सदरची जागा अपूरी पडत असल्यामुळे सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र. ५ या कार्यालयाशेजारी असलेल्या सडक परिवहन व राजमार्ग विभाग यांचे कार्यालयाची रिक्त असलेली ११६२ चौ.फूट जागा सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र.५ या कार्यालयास वाटप करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय :-

चेंबूर येथील प्रशासकीय इमारत क्र. २ मधील सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र. ५ या कार्यालयाशेजारी असलेल्या सडक परिवहन व राजमार्ग विभाग यांचे कार्यालयाची रिक्त असलेली ११६२ चौ.फूट जागा सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र.५ या कार्यालयास वाटप करण्यात येत आहे. त्यामुळे सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र.५ या कार्यालयाच्या ताब्यातील ३५० चौ.फूट जागा व सडक परिवहन व राजमार्ग विभाग यांचे कार्यालयाची रिक्त असलेली ११६२ चौ.फूट जागा अशी एकूण १५१२ चौ.फुट जागा सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र.५ या कार्यालयास वाटप करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी उपरोक्त जागेचा ताबा संबंधितांना द्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८११२३२५१३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradnya Prakash Sawant

Digitally signed by Pradnya Prakash Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dcab5c13648ccfdd9424ee4584da4e72f3f6f06dfd6b1eaa220fc9de68f36473, cn=Pradnya Prakash Sawant
Date: 2019.03.28 17:01:10 +05'30'

(प्र. प्र. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व सन्माननीय विधान सभा/परिषद व संसद सदस्य

२. मा.सभापतींचे सचिव/मा.अध्यक्षांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिवांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. सह सचिव (का.२२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. उप/सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१२. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई
१३. उप अभियंता, कुर्ला (सा.बां.) उपविभाग कुर्ला, मुंबई-७०
१४. निवडनस्ती.